# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 23/06/2020 (मंगळवार)
(दुपार)

### गळफास लावून मृत्यु

1) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 9 कि. मी. अंतरावर मौजा उदासा उमरेड शिवार येथे दिनांक 22/06/2020 चे 14:00 वा. ते 18.00 वा. पुर्वी फिर्यादींची मुलगी नामे– सेजल सिद्धार्थ मेश्राम(मृतक), वय 17 वर्ष, रा. उदासा हिने अज्ञात कारणाने तिच्या राहत्या घरी कुणीही हजर नसतांना आतुन दाराची कडी लावुन छताला केबल वायरने गळफास घेतल्यानंतर ती मृत अवस्थेत आढळून आली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सिद्धार्थ मानिकराव मेश्राम, वय 46 वर्ष, रा. उदासा उमरेड यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. उमरेड येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार भगवानदास यादव हे करीत आहे.

2) पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 18 कि. मी. अंतरावर मौजा मालेवाडा येथे दिनांक 22/06/2020 चे 05:30 वा. दरम्यान फिर्यादींचा मुलगा नामे– निकेश देवरावजी चौधरी(मृतक), वय 30 वर्ष, रा. मालेवाडा हे 10 वर्षापासुन इंडोरामा कंपनी बुट्टीबोरी येथे परमनंट कामाला होते. ते कधी–कधीच घरी मालेवाडा येथे येत होते. त्यांचे वडिल आपल्या शेतात बैलाला चारा टाकण्यासाठी कोठयात जाउन बाहेर आले तेव्हा निकेश चौधरी हा वळाच्या झाडाला गळफास लावलेल्या स्थितीत दिसून आला. त्यास ग्रामीण रूग्णालय भिवापुर येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– श्रावण देवरावजी चौधरी, वय 34 वर्ष, रा. मालेवाडा यांचे रिपोर्ट वरून पो. स्टे. भिवापुर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार भगवानदास यादव हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर